महानिर्मिती
महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित
प्रकाशगड, २ रा मजला, प्रो.अनंत काणेकर मार्ग, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०० ०५१,

क्र.महानिर्मिती/मासं-सेप्र/ No 9578 दिनांक:- 12 OCT 2022

# अधिसूचना

**विषय**:- कार्यकारी अभियंता, अति.कार्यकारी अभियंता व उप कार्यकारी अभियंता यांची रिक्त पदे सरळसेवा प्रवेशाद्वारे भरण्याकरीता निर्गमित सरळसेवा जाहिरातीस अनुसरुन ऑनलाईन प्रणालीद्वारे अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकाच्या मुदतवाढीबाबत.

**संदर्भ**:- महानिर्मिती जाहिरात क्र.०९/२०२२

महानिर्मिती कंपनीतर्फे जाहिरात क्र.०९/२०२२ अन्वये कार्यकारी अभियंता, अति.कार्यकारी अभियंता व उप कार्यकारी अभियंता यांची रिक्त पदे सरळसेवा प्रवेशाद्वारे भरण्याकरीता सरळसेवेची जाहिरात प्रसिध्द करण्यात आली आहे. सदर जाहिरातीस अनुसरुन कार्यकारी अभियंता, अति.कार्यकारी अभियंता व उप कार्यकारी अभियंता यांच्या रिक्त पदांकरीता ऑनलाईन प्रणालीद्वारे ऑनलाईन अर्ज सादर करण्याचा अंतिम दि.११.१०.२०२२ असा आहे.

तथापि, अर्ज सादर करण्याऱ्या उमेदवारांची संख्या आणि अर्ज सादर करताना आवश्यक असणारी कागदपत्रे प्राप्त करण्यासाठीचा कालावधी या बाबी विचारात घेता, मा.सक्षम अधिकारी यांनी उपरोक्त पदांसाठी ऑनलाईन अर्ज सादर करण्याच्या दिनांकास मुदतवाढ देण्याबाबत मान्यता प्रदान केली आहे. त्यानुसार वरील पदांसाठी अर्ज सादर करण्याचा अंतिम दि.११.१०.२०२२ ऐवजी दि.३०.१०.२०२२ असा असेल. तसेच जाहिरातीत नमूद शैक्षणिक अर्हता, अनुभव आणि वयाबाबतच्या अटी दि.३०.१०.२०२२ रोजी पूर्ण करणे आवश्यक असेल. याशिवाय जाहिरातीत नमूद इतर अटी व शर्ती अबाधित राहतील, याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

उपरोक्त मुदतवाढीच्या अनुषंगाने उमेदवारांनी ऑनलाईन अर्ज सादर करण्यासाठीची लिंक (Link) लवकरच कंपनीच्या संकेतस्थळावर "Career" मथळयाखाली प्रसिध्द करण्यात येईल.

(भि.य.मंता)
कार्यकारी संचालक (मासं)